**ठळक बातम्या**

- भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक नसून तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा प्रणेता बनल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- उद्योजक अनिल अंबानी यांच्या रिलायन्स समूहाशी संबधित तीन हजार कोटी रुपयांच्या चाळीसहून अधिक मालमत्ता ईडीकडून जप्त

- तेलंगणात झालेल्या रस्ते अपघातात १९ जणांचा मृत्यू, २० जण जखमी/ अपघातग्रस्तांना प्रधानमंत्र्यांकडून आर्थिक मदतीची घोषणा

**आणि**

- भारतीय महिला क्रिकेट संघानं पहिल्यांदाच पटकावलं आयसीसी एकदिवसीय विश्वविजेतेपद, विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय

**<><><><><>**

भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक नाही तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा प्रणेता बनला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीमध्ये उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५चं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. देशात नवोन्मेषाची परिसंस्था निर्माण व्हावी यासाठी सरकार प्रयत्न करत असून जगातली सर्वात यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा भारतात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

या कार्यक्रमात त्यांनी देशातल्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी १ लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजनेचाही प्रारंभ केला. खासगी क्षेत्राकडून संचलित केल्या जाणाऱ्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला प्रोत्साहन देणं हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड... बाईट - प्रधानमंत्री**

शिक्षणतज्ञ, संशोधन संस्था, उद्योग आणि सरकारमधल्या ३ हजारांपेक्षा जास्त सहभागींना एकत्र आणणं हे या तीन दिवसीय परिषदेचं उद्दिष्ट आहे. यामध्ये भाषणं, पॅनेल

चर्चा, सादरीकरणं आणि तंत्रज्ञान विषयक प्रदर्शनं आयोजित केली जातील. देशाची विज्ञान आणि तंत्रज्ञान परिसंस्था मजबूत करण्यासाठी संशोधक, उद्योग आणि तरुण नवोन्मेषकांमधल्या सहकार्यासाठी हे योग्य व्यासपीठ ठरेल.

**<><><><>**

तामिळनाडूच्या मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची गरज होती, असं मत केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी व्यक्त केलं आहे. ते आज चेन्नई इथं माध्यमांशी बोलत होते. राज्यात आजपासून पुनरीक्षणाची प्रक्रिया सुरू झाली. हे स्वागतार्ह पाऊल असल्याचंही ते म्हणाले. तामिळनाडूत झालेल्या पदभरतीतल्या कथित फसवणूक आणि भात खरेदीच्या आरोपांच्या सीबीआय चौकशीची मागणी त्यांनी यावेळी केली.

**<><><><>**

महाविकास आघाडीच्या मोर्च्यामध्ये ठाकरे बंधूंनी मतदार यादीतल्या दुबार मुस्लिम मतदारांच्या नावांचा उल्लेख केला नसल्याचा आरोप भाजपा नेते आशिष शेलार यांनी पत्रकार परिषदेत केला. मतदार याद्या शुद्ध असल्या पाहिजेत असा भाजपाचा आग्रह असल्याचं ते यावेळी म्हणाले. लोकसभा तसंच विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विजयी उमेदवारांच्या मतदारसंघातल्या मुस्लिम मतदारांच्या दुबार नावांची आकडेवारी शेलार यांनी यावेळी सादर केली. विरोधकांची शुद्ध मतदारयाद्यांबाबत प्रामाणिक भावना असेल तर त्यांनी मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षणाला आपला पाठिंबा जाहीर करावा, असं आवाहन शेलार यांनी दिलं.

**<><><><>**

प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय आणि त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीला राज्य सरकारचं प्राधान्य आहे, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सांगितलं. औंध इथं बहुउद्देशीय दंात रुग्णालय आणि संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत इंडियन डेंटल असोसिएशन, पुणे जिल्हा परिषद आणि औंधचं जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला, त्यावेळी पवार बोलत होते. हा सामंजस्य करार राज्याच्या सार्वजनिक आरोग्य सेवेतील नवा अध्याय आहे असे सांगून सर्वसामान्य

नागरिकांना  माफक दरात दंत विषयक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला.

<><><><>

पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबवली जाणारी सर्वायकल कॅन्सर फ्री पुणे अभियानाची सुरवात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज सह्याद्री राज्य अतिथीगृह इथं करण्यात आली. स्त्रियांमध्ये होणारा सर्वायकल कॅन्सर हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठ्या प्रमाणात आढळून येणारा आजार आहे. या आजाराच्या बाबतीत महिलांमध्ये जनजागृती करणं आणि लसीकरणाचं प्रमाण वाढवण्याची गरज आहे, असं यावेळी पवार म्हणाले.

<><><><>

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना काल पंजाबमधल्या घुमान इथं संत नामदेव महाराज सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर शिंदे यांनी महाराष्ट्र सदनाचं भूमिपूजन केलं. छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्राच्या आणि गुरु गोविंदसिंहांचा पंजाब संतांचा आणि शूरांचा आहे. राजगुरू आणि भगतसिंहांचा क्रांतिकारी वारसा आपण जपतो. दोन्ही राज्यांमध्ये अतूट आध्यात्मिक आणि सांस्कृतिक नातं आहे, असं शिंदे यावेळी म्हणाले.

<><><><>

उद्योजक अनिल अंबानी यांच्या रिलायन्स समूहाशी संबधित तीन हजार कोटी रुपयांच्या चाळीसहून अधिक मालमत्ता सक्तवसुली संचलनालयाने जप्त केल्या आहेत. दिल्ली, नोएडा, गाजियाबाद, मुंबई, पुणे, ठाणे, हैदराबाद, चेन्नई, कांचीपुरम आणि पूर्व गोदावरी इथं या मालमत्ता आहेत. अनिल अंबानी यांच्यावरील कर्ज घोटाळा आणि मनि लॉंड्रिंग प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><>

तेलंगणामध्ये रंगारेड्डी जिल्ह्यात चेवेल्लाजवळच्या मिर्जागुडा-खानापूर रस्त्यावर आज सकाळी झालेल्या अपघातात एकूण १९ जणांचा मृत्यू झाला. विकाराबाद-हैदराबाद मार्गावर सकाळी ८ वाजण्याच्या सुमाराला एका दुचाकीला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करताना एका ट्रकनं आरटीसी बसला धडक दिल्यामुळे हा अपघात झाला.  विकाराबादच्या वरिष्ठ

पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ मृतदेह रुग्णालयात पाठवण्यात आलं. तसंच २० जखमींना जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.

अपघाताची माहिती मिळण्यासाठी लोकांना मदत करण्यासाठी राज्य सरकारनं हैदराबादमध्ये एक नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. विशेष वैद्यकीय पथकं घटनास्थळी दाखल झाली आहेत.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

आयसीसी विश्वचषक महिला क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी मात करत भारतानं काल विश्वचषक पटकावला. नवी मुंबईतल्या डी वाय पाटील मैदानावर झालेल्या या सामन्यात दक्षिण अफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. भारतानं निर्धारित ५० षटकात ७ बाद २९८ धावा केल्या. शेफाली वर्मानं ८७, दिप्ती शर्मानं ५८, तर स्मृती मंधानानं ४५ धावा केल्या. ऋचा घोषनं ३४ धावांचं योगदान दिलं. या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ २७ चेंडू बाकी असतानाच २४६ धावात गारद झाला. भारतातर्फे दिप्ती शर्मानं ५, शेफाली वर्मानं २, तर श्री चरणीनं १ बळी मिळवला. शेफाली वर्मा सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

विश्वचषक पटकावून ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्व थरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं आहे. या विश्वविजेत्या संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं ५१ कोटी रुपयांचं रोख पारितोषक जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

सप्टेंबर महिन्यात झालेल्या नुकसानीची मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती राज्याचे जलसंपदा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.  दिंडोरी तालुक्यातील जानोरी, कोरटे परिसरातल्या भात पिकांच्या नुकसानीची त्यांनी आज पाहणी केली.  मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना नुकसानीबाबत माहिती देऊन

शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी दिला. अतिवृष्टीनं झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे पथक येणार असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><>

दिवंगत डॉ. संपदा मुंढे यांना न्याय मिळावा या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांसाठी विलेपार्ले इथं कूपर रुग्णालयातल्या निवासी डॉक्टरांनी आज आंदोलन केलं. या पार्श्वभूमीवर कूपर रुग्णालयातील सामान्य बाह्यरुग्ण विभाग सेवा बंद ठेवण्यात आल्या होत्या.

<><><><>

धुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातल्या कामांसह अन्य कामं अपेक्षेनुसार न करणाऱ्या ९७ ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. धुळे जिल्ह्यातल्या अन्य ग्रामपंचायतींपेक्षा कमी कामकाज असलेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना १५ दिवसांची मुदत देण्यात आली असून, अपेक्षित सुधारणा झाली नाही तर त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई केली जाणार असल्याचं या नोटिसांमध्ये स्पष्ट केलं आहे.

<><><><>

भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालय ७ नोव्हेंबरला निर्णय देणार आहे. बहुसंख्य राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव सुनावणीला उपस्थित होते, असं न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन व्ही अंजारीया यांच्या विशेष पीठानं सांगितलं. त्याआधी न्यायालयानं पश्चिम बंगाल आणि तेलंगणाशिवाय सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना न्यायालयात हजर राहायचे निर्देश दिले होते. या राज्यांनी अनुपालन शपथपत्रं सादर का केली नाहीत, अशी विचारणा न्यायालयाने केली. यावर सर्व राज्यांनी अनुपालन शपथपत्र सादर केल्याचं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितलं. या प्रकरणात न्यायालयानं प्राणी कल्याण मंडळालाही प्रतिवादी केलं आहे.

//<><><><>//